**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- IX | ISSUE- XII | DECEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विमुक्त भटक्या विद्यार्थ्यांचे अपेक्षित भवितव्य

**डॉ. शैलजा श्रीरंग मंडले**
सहाय्यक प्राध्यापक
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

नवीन राष्ट्रीय धोरण २०२० मध्ये जागतिक शिक्षण विकास कार्यक्रम समाविष्ट असून सर्वांसाठी समावेशक आणि सामान गुणवत्तेचे शिक्षण आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देण्याचे २०३० पर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्याविषयी आहे. पूर्वीची १० + ३ शैक्षणिक संरचना ऐवजी नवीन अध्यापन शास्त्रीय सरंचना ५ + ३ + ३ + ४ अशी शैक्षणिक सरंचना व्यवस्था असणार आहे. बोर्ड परीक्षेत फक्त पाठांतराला महत्व न देता दैनंदिन आयुष्यात उपयोगाला येणाऱ्या ज्ञानाचा वापर केला जावा याचा नवीन शैक्षणिक धोरणात उल्लेख आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील प्रमुख तत्वे / सिद्धांत २०२० मधील ५ + ३ + ३ + ४ या संरचनेतील दुसऱ्या टप्प्यामधील म्हणजे वय वर्षे ८ ते ११ यामधील विद्यार्थ्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यावर सांगण्यात आले की, प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता ३ री पर्यंत सर्वोच्च स्थान (प्राधान्य) देण्यात आले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती विषयी आढावा घेतला असता असे दिसून येते की, विमुक्त व भटक्या जाती- जमातीतील विद्यार्थी हे विविध कारणामुळे शैक्षणिक प्रवाहामध्ये स्थिर होत नाहीत किंवा प्राथमिक, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होत नाहीत. याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे....

१. पालकांची निरक्षरता
२. शिक्षणाबद्दल औदासिन्य
३. शैक्षणिक वातावरणाचा आभाव
४. सरकारी योजना / शिष्यवृत्त्या याबद्दल माहिती नाही.
५. वाडी वस्त्यांमध्ये शैक्षणिक बाबींची माहिती पोहोचत नाही. इ.

वरील महत्वाच्या कारणामुळे तळागाळातील दुर्लक्षित असा विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थी शाळेचे पूर्ण शिक्षण पूर्ण करू शकत नाही. शाळेचे शिक्षक पटसंख्या पूर्ण व्हावी म्हणून वाड्या - वस्त्यामधील या विद्यार्थ्यांना घेऊन येतात, परंतु हे विद्यार्थी मध्येच शाळा सोडून जातात. शाळेचे आकर्षण त्यांना वाटत नाही आणि गळती व स्थगिती ही समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येते. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये सांगण्यात आले आहे की, प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता ३ री पर्यंत सर्वोच्च स्थान देणे. ही गोष्ट विमुक्त जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची आहे. कारण निरीक्षणांती असे दिसून आले आहे की, जी विमुक्त भटक्या जमातीतील मुले मध्येच शाळा सोडतात त्यांना अक्षर ओळख व संख्याज्ञान नाही त्यामुळे ही मुले भावी आयुष्यात आपले जीवन यशस्वी जगू शकत नाहीत. किंबहुना समाजाला त्यांचा उपद्रव होतो. या मुलांना शिक्षणामधून मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान मिळाले तर पुढील बदल अपेक्षित आहेत.

१. विमुक्त जाती व भटक्या जमातीतील मुलांना वय वर्षे ० ते ८ पर्यंत शाळेच्या प्रवाहाबाहेर जाता येणार नाही. त्यांना शाळेची गोडी लागेल शिक्षणाबद्दलची अनास्था दूर होईल.
२.खेळावर व कृतीवर आधारित शिक्षणामुळे त्यांना अभ्यासाची भीती वाटणार नाही.
३. शिक्षकाची जबाबदारी राहील की पालकांशी भेटीमध्ये मुलांना शाळेमध्ये पाठविण्याचे महत्व समजावून सांगता येईल.

४. वाड्या-वस्त्यांमध्ये तीन वर्षाचे बालक या जाती - जमातीतील दिसले तर त्यांची नोंद त्वरित शाळेमध्ये होईल. जेणेकरून शाळेत येणे सक्तीचे होईल.

५. विमुक्त जाती-जमातीतील इयत्ता ३ री पर्यंतच्या मुला-मुलींना मूलभूत अक्षरज्ञान व संख्याज्ञान झाले तर वैचारिक प्रक्रिया सुरु होईल. इष्ट, अनिष्ट बाबी कळल्या तर भावी आयुष्यातील जीवनाला दिशा मिळेल. पुढील शिक्षण घेण्याची ऊर्जा मिळेल.

६. पुढील शिक्षण घेण्यासाठी शासकीय सोयी - सुविधा काय आहेत याची जाणीव होईल.

७. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना श्रद्धा व अंधश्रद्धा याबद्दल योग्य जाणीव निर्माण होईल.

८. चांगल्या सवयी व स्वच्छता याविषयीचे महत्व विमुक्त व भटक्या जातीच्या विद्यार्थ्यांना होईल.

९. विमुक्त व भटक्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे स्थलांतर काही प्रमाणात थांबेल. पाल्याच्या भविष्यासाठी आहे त्याच ठिकाणी थांबून रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न करतील.

१०.विमुक्त व भटक्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास चांगले जीवन जगण्याची उमेद निर्माण होईल.

वरील प्रमाणे इयत्ता ३ री पर्यंत मूलभूत संख्याज्ञान व अक्षरज्ञान विमुक्त जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांप्रत आले तर या विद्यार्थ्यांमधून चांगले भावी नागरिक तयार होतील. समाजाला राष्ट्राला विकासासाठी यांचा उपयोग होईल. या मुलांचे शिक्षण पूर्ण झाले नाही तरी पुढील काळात त्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण देऊन भावी आयुष्यात समाजाला त्यांचा उपयोग होईल. भारताची लोकसंख्या १४० कोटी आहे. त्यामधील महाराष्ट्रातील ११ कोटी या जाती-जमातीची लोकसंख्या आहे. स्वातंत्रोत्तर काळात विविध शैक्षणिक आयोग आलेले आहेत. तरीही दु:खाची बाब म्हणजे समाजातील तळागाळातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील व्यक्ती स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी शिक्षणापासून वंचित आहेत. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये सर्वांना सामावून घेण्यासाठी व भावी पिढी शिक्षणामध्ये केवळ पाठांतरामध्ये गुंतून न जाता आकलन क्षमता वाढवेल, कौशल्यावर आधारित शिक्षण घेईल त्यामुळे या १४० कोटी लोकसंख्येचा भारत हा जगाच्या पटलावर अग्रक्रम घेईल, अशा उल्लेखनीय बाबींच्या तरतुदी केलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात म. फुले यांनी विमुक्त जाती - जमातीच्या मुलांच्या शिक्षणाबाबत सांगितले होते की, ही मुले शाळेच्या शिक्षणात रमणार नाहीत, यांना कृतीवर आधारित / कौशल्यावर आधारित शिक्षण द्यावे. नवीन शैक्षणिक धोरणात हाच उल्लेख असल्यामुळे म. फुलेंच्या विधानाला पुष्टी मिळणार आहे. हे बदल करण्यासाठी किंबहुना हे धोरण राबविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक धोरण यात बरेच बदल राबविणे आवश्यक आहेत असे वाटते. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील इयत्ता ३ री पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मूलभूत अक्षरज्ञान व संख्याज्ञान आले पाहिजे हे मोठे वरदान आहे या तत्वांचे स्वागत आहे.

**संदर्भ** :-

1. वास्कर आनंद, वास्कर पुष्पा (१९९८) भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, नूतन प्रकाशन पुणे
2. educationgov.in
3. http5//wwweducationCDPL
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
5. मंडले शैलजा (२०१३) विमुक्त व भटक्यांची सद्यस्थिती आणि उपाययोजना, अक्षय प्रकाशन रत्नागिरी.